आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI NO. MAHBIL/2011/39044

वर्ष १४ | अंक ४ | जुलै २०२५ | मूल्य ₹५/-

Grahak Tituka Melwawa

# ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत

ग्राहक हिताय
ग्राहक सुखाय

मुंबई ग्राहक पंचायत MGP 50 सुवर्ण महोत्सवी वर्ष २०२४-२०२५

MEMBER OF CONSUMERS INTERNATIONAL

जागो ग्राहक जागो



# अधिकाधिक पर्यावरणस्नेही गणपती उत्सवासाठी आवाहन

– रंजना मंत्री, संघटन विभाग प्रमुख



गणपती उत्सवाची तयारी सुरू झाली असेल. मूर्ती मुक्रर करणे, आरास करण्यासाठी तयारी अशा कामांना सुरुवात झाली असेल. यंदाचा तुमचा गणपती आधीपेक्षाही अधिक पर्यावरणस्नेही असणार ना?

मुंबई ग्राहक पंचायत संस्थेच्या संघटन विभागातर्फे सर्व भौगोलिक विभागातून 'पर्यावरणप्रिय गणेशोत्सव २०२५' हे अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत सभासदांनी घरगुती गणपती उत्सवात कोणकोणत्या गोष्टी कराव्या, हे सुचवले आहे-

- गणेशाची मूर्ती शक्यतो शाडू माती, पेपरपल्प, धातू यांपासून केलेली असावी. घरातल्या मुलांनी एखाद्या कार्यशाळेत स्वत: शिकून मूर्ती बनवली असेल, तर ती पुजावी.
- सजावटीसाठी पुठ्ठा, कागद, बांबू, कापड, फुले, पाने अशा विघटनशील वस्तूंचा वापर करून पर्यावरणाचे रक्षण करावे.
- देवदर्शनास आलेल्यांना प्रसाद देताना (किंवा कुणाकडे देवदर्शनाला जाताना) भेसळ टाळण्यासाठी दुग्धजन्य मिठाई, पेढे यांऐवजी घरगुती पदार्थ, फळे, धान्य, सुकामेवा असे पदार्थ वापरावे.
- घरगुती गणेश उत्सवाच्या निमित्ताने, सामाजिक बांधिलकी जपत गरजू मुलांना शैक्षणिक साहित्य द्यावे.
- पाहुण्यांना खाऊ/प्रसाद देण्यासाठी 'वापरा-फेका' प्रकारच्या प्लेट, ग्लास वापरू नये. स्टीलच्या किंवा उसाच्या चिपाडापासून बनवलेली ताटे, बश्या, वाट्या किंवा केळीची पाने वापरू शकता.
- निर्माल्य कचऱ्यात टाकून वाया जाणार नाही, याची काळजी घावी. निर्माल्याचा वापर खत बनण्यासाठी करता येईल का हे पहावे किंवा खत बनवणाऱ्या काही संस्थांशी आधीपासूनच संपर्क करून ठेवावा. किंवा पालिकेकडून बसवण्यात आलेल्या निर्माल्य कलशात टाकावे.
- मूर्तीविसर्जन नदीत, समुद्रात न करता पिंपात किंवा कृत्रिम तलावात करावे. शक्यतो कायमस्वरूपी मूर्ती वापरली तर फारच उत्तम.
- विसर्जनादरम्यान मिरवणुकीत वाद्यांच्या आवाजाचे प्रदूषण टाळून झांजा, टाळ यांचा वापर करावा.

सार्वजनिक गणेशोत्सवातही पर्यावरण रक्षण व्हावे यासाठी आपण आग्रही राहावे. आपल्या आसपासच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून होणाऱ्या ध्वनिक्षेपणाच्या आवाजाचे प्रदूषण तसेच अवाजवी प्रकाशझोत यांबद्दल आपण त्यांना समजवावे. ग्राहक संघ सभासदांनी एकत्रितरीत्या जाऊन हे काम करता येईल. एकंदरीत सर्वत्र सार्वजनिक गणेशोत्सवात आवाज आणि झगमगाट यावर नियमांचे बंधन काटेकोर असावे आणि ते पाळले जावे यासाठी आपल्या संस्थेतर्फे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महानगरपालिका स्थानिक ऑफिस व पोलीस स्टेशन्स यांना निवेदन देण्यात येत आहे.



RNI No. MAHBIL/2011/39044

**मुंबई ग्राहक पंचायत**

**विश्वस्त मंडळ**

डॉ. बाळ फोंडके
अनुराधा गोरे
ललिता कुलकर्णी
अनुराधा नरसाळे
संजीव मंत्री

**अध्यक्ष**

डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**

अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**

ॲड. शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, स्वीकृत)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह, स्वीकृत)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**कार्यकारिणी सभासद**

ज्योती मोडक
शीला देवळेकर
राजेंद्र राणे
शुभदा चौकर
अनघा आचरेकर
मंगला गाडगीळ
शर्मिला रानडे
आलोक हर्डीकर
विवेक केळकर
प्रकाश पाटील
उदय पिंगळे (स्वीकृत)
नेहा जोशी
कल्पिता रानडे
विनायक सोमण (स्वीकृत)
सुधीर तावरे

**निमंत्रित**

संघटन विभाग प्रमुख

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक/संघटना सहमत असतीलच असे नाही.

# ग्राहक तितुका मेळवावा

जुलै २०२५ | आषाढ - श्रावण १९४७

## अनुक्रमणिका

**संपादकीय** — ०४
लख्ख कामगिरीचा उचित गौरव

**चला, दुग्धशक्तीचा उत्सव साजरा करूया!** — ०६

**पूर्णविरामाचे इच्छापत्र!** — ०८

**'बँकिंग'बद्दल बोलूया** — ११
दाव्याविना पडून राहिलेली आर्थिक मालमत्ता

**सिटी को.ऑप. बँक- याचिकेचे काम जोरात!** — १२

**न्यू इंडिया बँक- जनहित याचिकेची तयारी** — १२

**ग्राहक पंचायत पेठ दालन तक्ता – पालघर** — १४

**चाणाक्ष ग्राहक** — १६
पाकिटबंद खाऊ घेण्यापूर्वी...

**वाचू आनंदे** — १७
जनामनातला माणूस निळू फुले

**जुन्या इमारतींचा पुनर्विकास उपयुक्त कार्यक्रम** — १८

**मसाल्यांवर रंजक मार्गदर्शन** — १९

**'बँकेसंदर्भात सर्व काही'** — १९

**प्लास्टिकची भयावह समस्या** — २०

**गोरेगावात वेष्टण वाचन कार्यशाळा** — २०

**Be a Smarter Consumer in the wake of Influencers** — २१

**MGP calls for Global Grounding of all Boeing 787 Planes** — २३

**संपादक** शुभदा चौकर
**संपादकीय साहाय्य** नेहा जोशी, सुमिता चितळे
**सल्लागार** ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
**मुखपृष्ठ** राजेंद्र राणे
**अक्षरजुळणी व कला दिग्दर्शन** रिद्धी नि. पाटील, तन्वी गोखले
**मुद्रण** इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

Printed & Published by **NISHIKANT VINAYAK GURJAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat**, Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai – 400 056. Ph.: 022-4750 8541/42 (Office).
• Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in
• Website : **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

संपादकीय

# लख्ख कामगिरीचा उचित गौरव

"UNGCP च्या ४० वर्षांचा गौरव साजरा करण्यासाठी UNCTADने जिनिव्हा येथे होणाऱ्या ९व्या UN Conference मध्ये पहिल्याच दिवशी (७ जुलैला) एका विशेष सत्राचे आयोजन केले आहे आणि त्यात मला '40 Years of UNGCP - Global Impact' या विषयावर बोलण्यासाठी निमंत्रित केले आहे." – शिरीष देशपांडे यांचा हा मेसेज ११ जूनला आला आणि ऊर अभिमानाने भरून आला.

मुंबई ग्राहक पंचायतीचे सारथ्य करणारे शिरीष देशपांडे हे ग्राहक विषयातले जागतिक पातळीवरचे दिग्गज नेते आहेत. त्यांचा आवाका खूप मोठा आहे. ते ग्राहकविश्वाकडे दूरदृष्टीने बघतात. युनायटेड नेशन्सच्या व्यापार आणि विकास विषयक संघटनेने जगातील सर्व सदस्य देशांसाठी बनवलेल्या आजच्या नियमावलीचे श्रेय हे निःसंशयतेने शिरीष देशपांडे यांचे आहे.

थोडी पार्श्वभूमी समजून घेऊया. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी तसेच सदस्य राष्ट्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी युनायटेड नेशन्स (संयुक्त राष्ट्र)ची स्थापना २४ ऑक्टोबर १९४५ रोजी करण्यात आली. त्यानंतर वेगवेगळ्या विषयांना वाहिलेल्या शाखा स्थापन केल्या गेल्या, ज्यात विकसनशील देशांमध्ये व्यापार, गुंतवणूक आणि विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी १९६४ मध्ये UNCTAD (United Nations Conference on Trade and Development) ची निर्मिती झाली.

UNCTAD ने जगातील सर्व सदस्य देशांसाठी बनवलेली मार्गदर्शक तत्त्वे United Nations' Guidelines for Consumer Protection (UNGCP) या नावाने ओळखली जातात. ती पहिल्यांदा आखली गेली १९८५ मध्ये. त्यानंतर १९९९ मध्ये त्यात एका मुद्द्याची भर टाकली गेली, ती 'शाश्वतता' (Sustainability) या तत्त्वाची. दरम्यान जागतिकीकरणामुळे बदललेल्या परिस्थितीत ग्राहक संरक्षण विषयक मार्गदर्शक तत्त्वांचा फेरआढावा घेऊन त्यात नव्याने सुधारणा केली पाहिजे, याकडे प्रथम लक्ष वेधले ॲड. शिरीष देशपांडे यांनी!

जगातील बहुतांश देशांत आंतरराष्ट्रीय व्यापार प्रचंड प्रमाणात होत आहे. एव्हाना आपण खऱ्या अर्थाने ग्लोबन सिटीझन झालो आहोत. देशोदेशींच्या कंपन्यांची उत्पादने वापरत आहोत. शिक्षण, व्यापार, पर्यटन अशा कारणांनी देशाच्या सीमा ओलांडत आहोत. अशा वेळी ग्राहक म्हणून आपल्याला कोणत्याही देशाशी व्यवहार करताना समान न्याय मिळायला हवा. त्यासाठी मुळात सर्व देशांनी काही समान संकेत पाळायला हवे. नाहीतर एका देशाने नाकारलेला सदोष किंवा निकृष्ट माल दुसऱ्या देशात धाडला जाऊ शकतो. असे डंपिंग विकसित देश विकसनशील आणि अविकसित देशांत सर्रास करत असतात. बहुदेशीय व्यापार आणि व्यवहार करतानाही नियमांत साम्य आवश्यक असते. नाहीतर पळवाटा निघतात. अशा अन्याय्य व्यापारी प्रथा संपाव्या, जगभरातील सर्व ग्राहकांचे संरक्षण व्हावे, त्यांना समान न्याय मिळावा, यासाठी जगभर काही सर्वमान्य तत्त्वे पाळली जायला हवी. ही तत्त्वे ठरवणारी जागतिक संस्था म्हणजे `युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन ट्रेड अँड डेव्हलपमेंट- UNCTAD'.

ॲड. देशपांडे Consumers' International (CI) च्या संचालक मंडळात असताना ६ मार्च २०१२ रोजी UNCTAD च्या जिनिव्हा येथील एका जागतिक परिषदेत CI चे प्रतिनिधी म्हणून ते गेले होते. ती सभा होती- Access to Knowledge (A2K) या विषयावर. तिथे देशपांडे यांनी केवळ ३ मिनिटांत अत्यंत महत्त्वाचा मुद्दा नेमकेपणाने मांडला की, UNCTAD च्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आता काळानुरूप सुधारणा करणे गरजेचे आहे. त्यांनी या कल्पनेचा पाठपुरावा नेटाने केला. हा विषय सातत्याने लावून धरल्याचे फलित म्हणून, आंतरराष्ट्रीय पातळीवर एक सर्वेक्षण करून विविध देशांना सुधारणा सुचवण्याचे आवाहन केले गेले. त्यानंतर लागोपाठ काही वेबिनार झाले.

ॲड. शिरीष देशपांडे यांनी आणखी एक मुद्दा आग्रहाने मांडला होता की, या ग्राहक संरक्षण विषयक नियमावलीची अंमलबजावणी प्रत्येक देशात कशी केली जाते, हे जोखण्यासाठी संयुक्त राष्ट्रांचे ग्राहक विषयक कन्वेन्शन किंवा निदान कमिशन निर्माण केले जावे. या सूचनेत खरे तर व्यापक हित होते. पण जगातील बलाढ्य देशांना अशा सूचना आणि अशा यंत्रणा मानवत नाहीत. इतकी न्याय्य, समानता मूलक यंत्रणा त्यांच्या फायद्याची नसते. साहजिकच




UNCTAD व्यवस्थापनाने ही सूचना स्वागतार्ह असल्याचे मान्य केले. मात्र बजेटअभावी असे कमिशन लगेच नेमणे शक्य होईलच असे नाही, असे म्हटले. त्यांनीच यावर चांगला मध्यमार्ग सुचवला. ते म्हणाले की, यासाठी आपण एक आंतरराष्ट्रीय कार्यकारी गट नेमू या!

या सूचनेला बहुतांश विकसनशील देशांनी दुजोरा दिला. काही दांडग्या देशांनी विरोध केला. असा अंमल गाजवणारी व्यवस्था त्यांना सोयीची नसते. जेते देश अशा कल्पना उधळून लावण्याचा प्रयत्न सतत करत असतात. पण देशपांडे यांनी चिकाटीने हा मुद्दा चार वर्षे सातत्याने लावून धरला. बरीच मेलामेली (इ-पत्रव्यवहार) व वेबिनार झाले. मुत्सद्देगिरी (Advocacy)चा उत्तम नमुना होता तो!

अखेरीस, २२ डिसेंबर २०१५ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने सुधारीत मार्गदर्शक तत्त्वांना मान्यता ठेणारा ठराव मंजूर केला. आंतरराष्ट्रीय स्तरावर एक कायमस्वरूपी देखरेख यंत्रणा स्थापन करण्याचे ठरले. त्याला नाव दिले गेले- InterGovernmental Group of Experts (IGE). ही घोषणा करतानाच त्याचे श्रेय मुंबई ग्राहक पंचायतीला बहाल केले गेले. 'मुंबई ग्राहक पंचायतीने सुचवलेला पर्याय म्हणजे 'युनायटेड नेशन्स'च्या शिरपेचातील चमकदार हिरा आहे!' २२ डिसेंबर २०१५ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या UNCTAD या संघटनेचे सेक्रेटरी जनरल श्री. हासन यांनी जाहीर केले. आणि मुंबई ग्राहक पंचायतीच्या मुकुटात हा तुरा खोचला गेला!

संयुक्त राष्ट्रांच्या पातळीवर असे मोलाचे काम फत्ते केल्यावर शिरीष देशपांडे यांनी तत्कालीन केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री रामविलास पासवान यांना हा सर्व प्रयास समजावून सांगितला आणि आवाहन केले की, संयुक्त राष्ट्रांचे प्रतिनिधी म्हणून जर जगभरातील सर्व सदस्य राष्ट्रांना ही सुधारीत मार्गदर्शक तत्त्वे पाळावी असे वाटत असेल, तर प्रत्येक देशाने त्यासाठी एक देशांतर्गत टास्कफोर्स (कृतिगट) नेमावा. २०१६ च्या जुलै महिन्यात असा टास्कफोर्स भारतात नेमला गेला. अशी मुहूर्तमेढ रचल्याबद्दल १७ ऑक्टोबर २०१६ ला UNCTAD ने जिनिव्हा येथे UNGCP संदर्भातील कायमस्वरूपी देखरेख यंत्रणेच्या पहिल्या बैठकीत संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सदस्य राष्ट्रांसमोर भारताचे उदाहरण ठेवले गेले! या बैठकीत भारतातील टास्कफोर्सची कार्यवाही कशी असेल, जगभर ती कशी असावी- याचे सादरीकरण करण्याचा मान ॲड. शिरीष देशपांडे यांना मिळाला. त्यांच्या कृतार्थ मनात आले- 'बीज अंकुरे अंकुरे जिनिव्हाच्या थंड बर्फात!'

आंतरराष्ट्रीय पातळीवर चिवटपणे मुत्सद्देगिरी करून युनायटेड नेशन्सच्या पातळीवर ग्राहक हिताची नियमावली अपडेट करणे, त्याच्या अंमलबजावणीसाठी आग्रही राहणे- याचा ध्यास देशपांडे यांना का धरावासा वाटला असावा? –याचे कारण त्यांच्या मनात ठसलेले व्यापक ग्राहकहित! जागतिकीकरणाच्या या युगात विकसित देश भारताकडे मोठी बाजारपेठ म्हणून बघत आहेत. भारताची अर्थव्यवस्था प्रगतीपथावर आहे. हे युग मार्केटिंगचे आहे. असे असताना भारतीय ग्राहकांचे सक्षमीकरण झाले नाही तर तो हतबल होईल. आपण सध्या बघतो आहोत की, इ-कॉमर्सच्या बेबंद जंजाळात अनेक ग्राहक अनेक प्रकारे गंडवले जात आहेत. आर्थिक घोटाळे वाढत आहेत.

सध्या जगात अनेक ठिकाणी युद्धग्रस्त वातावरण आहे. आर्थिक अस्थिरता खूप वाढली आहे. अमेरिका तर मनमानीपणे अनेक निर्बंध लादत आहे. स्वत:ला सुपरपॉवर समजणारा देश इतरांच्या हिताचा विचार करताना दिसत नाही. सदस्य राष्ट्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी युनायटेड नेशन्सची स्थापना झाली असेल तर व्यापार आणि विकासासाठी असलेल्या या महत्त्वाच्या शाखेचीही काही कर्तव्ये आहेत. सर्व १९५ सदस्य राष्ट्रांना न्याय्य अशा जागतिक व्यापारनीती सगळ्यांनी अनुसरणे, ग्राहक संरक्षण विषयक UN च्या नियमावलीची अंमलबजावणी प्रत्येक देशात कशी केली जाते, हे वेळोवेळी तपासून पाहणे, गरज असेल तेव्हा त्यात सुधारणा करण्यासाठी संबंधित देशाला सूचना देणे– हे होण्याचीही ठोस यंत्रणा हवी. ती यंत्रणा निर्माण व्हावी, त्याचे काम नियमित व्हावे,

यासाठी देशपांडे आग्रही राहिले. पाठपुरावा करत राहिले. आता तर ग्राहक विषयक UN कमिशन निर्माण व्हावे, भारत सरकारने त्यात पुढाकार घ्यावा, यासाठी ॲड. देशपांडे प्रयत्नरत आहेत. Commission on Status of women, Commission on Human Rights तसे Commission on Consumers निर्माण व्हायला हवे, हे व्यापक ग्राहक हिताचे स्वप्न देशपांडे बघत आहेत.

UNCTAD कडून या अपेक्षा करत असताना एक प्रश्न उरतोच की ही संस्था स्वयंपूर्ण आणि स्वायत्त आहे का? सदस्य राष्ट्रांकडून मिळणाऱ्या फंडिंग व्यतिरिक्त युरोपीय युनियन आणि अमेरिकेसारख्या श्रीमंत देशांकडून त्यांना फंड मिळतात. सध्या अमेरिकेने आणि युरोपीय युनियनने हात आखडले घेतलेले असल्याने UNCTAD ही आर्थिक विवंचनेत आहे. ज्यांचे फंडिंग घेतो, त्यांच्या विरोधात निर्णय घेण्याची स्वायत्तता शाबूत राहात नाही. UNCTAD स्वयंपूर्ण आणि स्वायत्त होणे, हीही काळाची गरज आहेच. मात्र हे घडेल तेव्हा घडेल.

तूर्तास, व्यापक ग्राहक हितासाठी UNCTAD ची यंत्रणा असणे हिताचे आहे. त्याची निकड जाणवणे, त्यासाठी आग्रह धरणे, आपली भूमिका UNCTAD ला समजावणे, त्यासाठी कसून अभ्यास करणे, योग्य ठिकाणी योग्य वेळी आपली भूमिका प्रभावीपणे मांडणे- अशा सर्व गोष्टी देशपांडे यांनी ध्यासाने व जिद्दीने केल्या, त्याचे फलित म्हणून UNGCP मध्ये असे मूलगामी बदल घडून आले.

या मिशनमध्ये त्यांना मदत करायला काही उत्साही कार्यकर्ते वेळोवेळी स्वतःहून पुढे आले होते. बराच अभ्यास करायचा होता, त्यासाठी टीमवर्क लागते. मीही होते या कार्यकर्त्यांमध्ये. या कल्पनेची रुजवण झाली Consumer International च्या दिल्ली येथील परिषदेत. त्याची मी साक्षीदार आहे. नंतर UNCTAD च्या जिनिव्हा येथील परिषदेत ही कल्पना देशपांडे यांनी मांडली. तेव्हाही मी त्याला पुस्ती जोडली. वर्षा राऊत, पूजा जोशी-देशपांडे, अर्चना सबनीस आणि शर्मिला रानडे यांचीही देशपांडे यांना मोलाची साथ लाभली. त्या सर्वांचे यातील योगदान उल्लेखनीय व अविस्मरणीय आहे, हे ते आवर्जून सांगतात.

आता ७ जुलैला होत असलेल्या परिषदेत '40 Years of UNGCP - Global Impact' या विषयावर बोलण्यासाठी शिरीष देशपांडे यांना UNCTAD चे आमंत्रण येणे हे स्वाभाविक आहे... आपल्या संस्थेसाठी ही अभिमानाची बातमी आहे, ते म्हणूनच!

**- शुभदा चौकर**

# चला, दुग्धशक्तीचा उत्सव साजरा करूया!

**– अपर्णा पित्रे**

संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटना २००१ पासून एक जून हा दिवस 'जागतिक दुग्ध दिवस' म्हणून साजरा करते. या दिवसाचे औचित्य साधून मुंबई ग्राहक पंचायतीचा बोरिवली विभाग आणि इंडियन डेअरी असोसिएशनचा (IDA) पश्चिम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एक जून या दिवशी दुग्ध उत्पादन या विषयांवरील तज्ज्ञांचे 'चला उत्सव साजरा करूया' असे एक माहितीपूर्ण व्याख्यान आणि चर्चासत्र आयोजित केले होते.

व्याख्यात्यांचे परिचय आणि सत्कार बोरिवली विभागाचे सहकार्यवाह पंकज कुलकर्णी यांनी केले.

प्रथम माधव पाटगावकर यांनी मार्गदर्शन केले. ते इंडियन डेअरी असोसिएशन पश्चिम विभागाचे कार्यवाह आहेत. त्यांनी डेअरी टेक्नॉलॉजी या विषयात प्राविण्य मिळवून जागतिक बँकेच्या स्कॉलरशिपवर ब्रिटनमध्ये मार्केटिंगमध्ये डिप्लोमा केला आहे. १९४८ मध्ये IDA ची स्थापना झाली. डेअरी उद्योगाशी संबंधित सर्व उद्योग ती संस्था बघते. ठिकठिकाणी प्रदर्शने भरवली जातात. तेथे दुधाचे महत्त्व व्याख्यानांमधून सांगितले जाते. त्यानंतर डॉ. दिलीप पारेख सर दूध, दुधातील घटक व दुधाचे महत्त्व याविषयी बोलले. ते IDA च्या पश्चिम विभागाचे व्हाईस चेअरमन आहेत. डॉ. पारेख डेअरी विषयात तज्ज्ञ आहेत आणि त्यांनी पोस्ट डॉक्टरेट शिक्षण घेतले आहे. तसेच त्यांनी 'टेक्नॉलॉजी ऑफ डेअरी प्रॉडक्ट' या विषयावर पुस्तकही लिहिले आहे.

त्यांनी सांगितले की, दूध हे पूर्ण अन्न आहे. दूध पिण्याचे अनेक फायदे आहेत. पूर्ण दिवसात अर्धा लिटर तरी दूध प्यावे आणि दूध घेताना ब्रॅण्डेड दूध किंवा प्रोसेस केलेलेच दूध प्यावे. तबेल्याचे सुटे दूध कधीही पिऊ नये. कुठल्याही आजार असला तरी दूध हे सेवनास उत्तमच असते. त्यात 30% कॅलरीज, वीस टक्के विटामिन व फॉस्फरस असते. दूध, दही, पनीर अशा कोणत्याही प्रकारात दुधाचे सेवन अवश्य करावे. दूध व्यवसायात देशातील दहा कोटी शेतकरी जोडले गेले आहेत. अशा प्रकारे दूध उत्पादन हा शेतकऱ्यांचा जोडधंदा आहे.

त्यानंतर डॉ. जे. बी. प्रजापती यांनी दुधाविषयीचे गैरसमज दूर केले. डॉ. प्रजापती हे IDA च्या पश्चिम विभागाचे चेअरमन आहेत. त्यांनी डेअरी मायक्रोबायोलॉजी या विषयावर डॉक्टरेट केले आहे. त्यांनी सांगितले की, दूध हे मांसाहारी आहे असा गैरसमज पसरवला जातो. पण दूध हे पूर्णतः शाकाहारी आहे. दूध, दही, चीज, तूप या पदार्थात भरपूर प्रमाणात प्रोटीन आहे. जेवढे वजन असेल तेवढे ग्रॅम प्रोटीन रोज आपण आहारातून घ्यायला पाहिजे. ते आपल्याला दुधातूनही मिळू शकते.

नंतर IDA चे दिल्लीचे मान्यवर सभासद असलेले आणि सुवर्णपदक मिळवलेले डॉ. राजेश लेले यांनी दूध प्रकल्पांचे आणि श्वेतक्रांतीचे महत्व सांगितले. सहजपणे उपलब्ध होणारे आणि जास्तीत जास्त पौष्टिकता असलेले दूध हे सर्वांनी सेवन केलेच पाहिजे या गोष्टीवर त्यांनी भर दिला. सरकार दूध उत्पादक शेतकऱ्यांना तांत्रिक मदत करते. महाराष्ट्रात चीज सर्वात जास्त प्रमाणात बनते. ही चीजची मागणी २० ते २५ टक्क्यांनी वाढतच चालली आहे. सध्या भारतात दुधाच्या मागणीपेक्षा खूप जास्त प्रमाणात दूध उपलब्ध आहे. एवढे जास्त आहे की भारत चीज आणि बटर निर्यात करते. डॉ. लेले यांनी अनेक दूध प्रकल्प विकसित केले आहेत.

यानंतर महानंद डेअरीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. हातेकर यांनी शेतकरी ते डेअरी असा दुधाचा प्रवास कसा होतो हे वर्णन करून सांगितले. सहकारी तत्त्वाने जे दूध शेतकऱ्यांकडून जमा केले जाते ते शुध्द प्रमाणात असते. त्यांनी सांगितले की सहकारी




**माधव पाटगावकर सभासदांना मार्गदर्शन करताना**

संस्थांनी उत्पादित केलेले दूध सर्वांनी घेतले तर त्याचा फायदा थेट शेतकऱ्यांना होतो, कारण त्यामुळे शेतकऱ्यांना दुधाचा चांगला दर मिळतो. कोणत्याही कंपनीचे पॅकींग असलेलेच दूध, तूप, दही, चीज विकत घ्यावे कारण ते दूध कलेक्शन करणारे शेतकरी वर्गाला डेअरीकडून प्रशिक्षण दिले जाते. वेळोवेळी गायी, म्हशीना व्हॅक्सीन दिले जातात. डेअरीमधून पाश्चराईज करून दूध पॅक होते. यासाठी पॅक केलेले ब्रँडेड दूधच घ्यावे. असे हातेकर यांनी सांगितले.

त्यानंतर अरुण पाटील यांनी दूध उत्पादनाविषयी माहिती दिली. त्यांनी डेअरी आणि फूड इंजिनियरिंग या विषयावर आयआयटी खरकपूर येथे शिक्षण घेतले आहे. ते सध्या IDA दिल्ली येथे व्हाईस प्रेसिडेंट आहेत. त्यांनी सांगितले की, दूध हा नाशिवंत पदार्थ आहे. त्यामुळे त्याच्यावर प्रक्रिया करणे गरजेचे आहे. भारताचे दूध उत्पादन आणि त्याची गुणवत्ता आंतरराष्ट्रीय पातळीवर जर तपासली तर ती उत्कृष्ट आहे. तसेच त्यांनी सांगितले की भारतातील दूध उत्पादन हे A2 चेच आहे. A1, A2 ही प्रथिनांची नावे आहेत. A-2 हे वेगळे आहे, खूप पौष्टीक आहे म्हणून जास्त पैसे मोजून घेतले जाते. आपल्या देशी गायीचेही दूध व तूप तेवढेच पौष्टीक आहे, हे पाटील सरांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रेक्षकांनी प्रश्न विचारले आणि मान्यवरांनी त्यांची योग्य उत्तरे देऊन सर्वांच्या मनातील दुधाबद्दलचे गैरसमज दूर केले. या कार्यक्रमाला १४० सभासद उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुहासिनी संत यांनी सांगितले की, आज दुधाबद्दलचे ग्राहक प्रबोधन उत्तम रीतीने झाले. दुधाचा दर्जा, दुधाबद्दलच्या अफवा याबद्दलचे सर्व गैरसमज मान्यवरांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने दूर केले. कार्यक्रमानंतर बहार लस्सी व सुगंधी दुधाचा आस्वाद श्रोत्यांनी घेतला.

# पूर्णविरामाचे इच्छापत्र!

– प्रा. डॉ. निखिल दातार (स्त्री रोग तज्ज्ञ आणि याचिकाकार्ते)



परवाचीच घटना. एका ८२ वर्षे वय असलेल्या आणि काही महिने प्रदीर्घ आजाराने अंथरूणाला खिळलेल्या आजी. एकदम तब्येत बिघडली म्हणून त्यांची काळजी घेणाऱ्या बाईंनी त्यांना हॉस्पिटलमध्ये नेले. आजींची शुध्द हरपलेली होती. मुले मुंबईबाहेर असतात. ती धावत-पळत आली. तोपर्यंत आजींच्या शरीरातील प्राणवायूचे प्रमाण कमी झाल्याने डॉक्टरांनी लगेच व्हेंटिलेटर लावला होता. एक-दोन दिवसातच डॉक्टरांनी स्पष्ट कल्पना दिली- “आजींचे काही खरे नाही.” मुलगा म्हणाला, “माझी आई मला नेहमी सांगायची की मला मृत्यू लांबवणारे उपचार नको आहेत.” मुलाने डॉक्टरांनी विनंती केली. “डॉक्टर व्हेंटिलेटर काढा.” डॉक्टरांनी नेमका तोच डायलॉग ऐकवला जो “व्हेंटिलेटर” या चित्रपटातील डॉक्टरची भूमिका करणाऱ्या बोमन इराणी यांच्या तोंडी होता- ‘एकदा व्हेंटिलेटर लावला की तो काढू शकत नाही. तुम्हाला हवे असेल तर आजींना डिस्चार्ज करून घरी घेऊन जा.. जे काही देवाच्या मानत असेल ते होईल.’ आता मुलांना प्रश्न पडला की करायचे काय? घरी न्यावे तर ऊर्ध्व लागलेल्या जवळच्या व्यक्तीचा त्रास बघवत नाही आणि आपण त्यांना काही आराम पडेल असे करू शकत नाही. त्यातून लोक काय म्हणतील ही रास्त शंका!

ही कथा ही अगदी घराघरातील आहे. अशा वेळी नेमके काय करायचे हे कोणालाच धड सुचत नाही. कधी अशा परिस्थितीत घरी आणले तर समाजातील लोक ‘मुलांना आई वडिलांचे काही करायचे नव्हते’ असे म्हणून दूषणे देतात. तर कधी ‘डॉक्टर आणि हॉस्पिटलचे पैसे उकळण्यासाठी याला मुद्दामहून घरी जाऊ देत नाहीत किंवा व्हेंटिलेटर काढत नाहीत’ असे आरोप केले जातात.

या सर्व परिस्थितीवर सर्वोच्च न्यायालयाने मात्र यावर अगदी ठोस उपाय दिलेला आहे. ‘कॉमन कॉजेस विरुध्द युनियन ऑफ इंडिया’ या केसमध्ये कोर्टाने ‘निष्क्रिय इच्छामरणाला’ कायदेशीर संमती दिली आहे. एवढेच नव्हे तर इच्छामरणाचा (फक्त निष्क्रिय किंवा passive) आपला अधिकार बजवण्यासाठी नागरिकांनी नेमके काय केले पाहिजे, हे सुध्दा कोर्टाने सांगितले आहे. असे असून सुध्दा महाराष्ट्रात काहीही कारवाई झाली नाही. म्हणूनच मी उच्च न्यायालयात जनहित याचिका दखल केली. मी केलेल्या (प्रा. डॉ. निखिल दातार, आनंद राऊत, गरिमा पाल विरुध्द महाराष्ट्र राज्य, भारत सरकार, मुंबई महानगरपालिका आणि मेडिकल कौन्सिल (नॅशनल मेडिकल कमिशन) या याचिकेमुळे निष्क्रिय इच्छामरणासाठी आवश्यक यंत्रणा आता महाराष्ट्रात उभी रहात आहे.

**न्यायालयाने दिलेल्या निवाड्याविषयी थोडेसे:**

१) नागरिकांना सक्रिय इच्छामरणाचा (औषध घेऊन मरण प्राप्त करण्याचा) अधिकार नाही.

२) निष्क्रिय इच्छामरणाचा अधिकार आहे. म्हणजेच ठराविक उपचार नाकारून किंवा सुरूच न करून मरण जवळ करण्याचा अधिकार आहे. हा घटनेने दिलेल्या मूलभूत हक्कापैकी एक आहे.

३) यासाठी नागरिकांनी स्वतःचे Advance directive (मी त्याला ‘पूर्णविरामाचे इच्छापत्र’ असे नाव दिले आहे) बनवून ठेवावे.

**४) सरकारने खालील गोष्टी कराव्यात:**

**अ)** कस्टोडियन नेमावेत. ते ग्रामपंचयातीपासून महानगरपालिकेपर्यंत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये असावेत, त्यांचे काम हे आलेली इच्छापत्र जपून ठेवणे हे असेल.

**ब)** शक्यतो ही इच्छापत्रे डिजिटल पध्दतीने ठेवण्याची व्यवस्था असावी.

**क)** तसेच सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या डॉक्टरांचे एक पॅनल तयार करावे.

५) जेव्हा ती व्यक्ती खरेच दुर्धर आजारी असेल तेव्हा या इच्छापत्राच्या आधारे उपचार केले किंवा न केले जावेत. हे बंधन डॉक्टरांच्या वर असेल. त्यासाठी रुग्णालय तिथल्या तीन डॉक्टरांची समिती नेमेल आणि दोन दिवसांत निर्णय दिला जाईल. कुठलाही गैरप्रकार होऊ नये म्हणून अजून

वेगळ्या तीन डॉक्टरांची समिती नेमली जाईल. त्यातील एक डॉक्टर हा सरकारी डॉक्टरचे प्रतिनिधित्व करेल. त्यासाठी आणखी दोन दिवस दिले जातील. एकंदरीत रुग्ण आणि नातेवाईक, ३+३=६ डॉक्टर ह्या सगळ्यांचे मतैक्य असेल तर रुग्णाच्या ट्रीटमेंट थांबवण्यात येतील.

**या व्यवस्थेचा गैरवापर होऊ शकतो का?**

विशेषतः इच्छापत्र बनवले असेल तर माझ्या मते गैरवापर करणे अशक्य आहे. त्यातून कस्टोडियनकडे त्या व्यक्तीने स्वेच्छेने प्रत जमा केली असल्याने हा प्रश्न यातच नाही. सहा डॉक्टरांच्या सहभागाने शेवटी निर्णय घ्यायचा असल्याने यामध्ये गैरप्रकार होण्याची शक्यता मला वाटत नाही. म्हणूनच मी माझे इच्छापत्र बनवले आहे. जगातील अनेक देशांमध्ये सर्रास असे इच्छापत्र बनवले जाते. ते कायदेशीर आहे आणि त्याची अंमलबजावणी होते. त्यात गैरप्रकार झाल्याचे ऐकिवात नाही.

**पूर्णविरामाच्या इच्छापत्रामध्ये काय असावे? त्याचा मसुदा काय असावा?**

हे आपल्या संपत्तीचे इच्छापत्र नाही. त्यामुळे या इच्छापत्रात आपल्याला नेमके काय, कुठले आणि कितपत उपचार दिले जावेत ह्या विषयीच्या इच्छा लिहून ठेवायच्या आहेत. हे इच्छापत्र १८ वर्षांवरील कोणीही सज्ञान व्यक्ती बनवू शकते. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर लगेचच मी माझे पूर्णविरामाचे इच्छापत्र बनवून टाकले. मी माझ्या इच्छापत्रामध्ये साधारण वय ७० नंतर आणि दुर्धर आजार जसे की कर्करोग, अल्झायमर सारखे आजार असतील तर हे इच्छापत्र लागू होईल, असे लिहिले आहे. अशा अवस्थेत प्रत्येक व्यक्ती आपल्याला व्हेंटिलेटर, डायलेसिस, पोटात किंवा शरीरात घालण्याच्या नळ्या अशा उपचार पध्दती हव्या आहेत की नको, हे लिहू शकतो. जसे की मी feeding tube किंवा सलाईन ह्या उपचार पध्दतीला होकार आणि इतर उपचारांना नकार लिहून ठेवला आहे. ह्या मसुद्यामध्ये पेन किलर, किंवा वेदना शमवण्याचे सर्वोत्तम उपाय मला दिले जावेत, असा उल्लेख मी केला आहे. तसेच अवयव दान करण्याविषयी लिहिले आहे.

माझा मसुदा **www.drnikhildatar.com** ह्या संकेत स्थळावर मोफत उपलब्ध असून वाचकांनी त्याचा आधार घ्यायला काहीच हरकत नाही. अर्थात हा विषय पूर्णपणे वैयक्तिक असल्याने त्यात आवश्यक ते बदल करावेत. अशा वेळी व्यक्ती स्वतः शुध्दीवर असेल तर ती व्यक्ती स्वतःचे निर्णय घेऊ शकते. पण जर शुध्द हरपली असेल तर? मग तेव्हा डॉक्टरांना तरी कोण सांगणार की आपण असे इच्छापत्र तयार केले आहे म्हणून? याच साठी जे कोण नातेवाईक आपल्या बाजूने निर्णय घेणार असतील (executor) त्यांची नावे या इच्छापत्रात नक्की लिहून ठेवावीत. आणि त्यांना त्यांच्या जबाबदारीची कल्पना सुध्दा द्यावी. आपल्या फॅमिली डॉक्टरचे मत घेणे किंवा त्यांचे नाव लिहून ठेवायला काहीही हरकत नाही.

**एकदा बनवलेले पूर्णविरामाचे इच्छापत्र बदलता येते का?**

होय. आपल्याला वाट्टेल तितक्या वेळा आपण नवीन इच्छापत्र बनवू शकतो. सर्वात शेवटी बनवलेले इच्छापत्र हे सगळ्यात ग्राह्य धरले जाते.

**इच्छापत्र कसे बनवावे?**

इच्छापत्र बनवण्यासाठी स्टॅम्प पेपर, लिगल पेपर लागत नाही. अगदी हाती लिहिलेले इच्छापत्र सुध्दा कायदेशीर आहे. तसेच ह्या इच्छापत्राला कुठलेही रजिस्ट्रेशन करावे लागत नाही. पण नोटरी मात्र करणे गरजेचे आहे. तसेच नोटरी करायला जाताना दोन साक्षीदार असायला हवे आहेत. शक्यतो executor असलेली व्यक्ती साक्षीदार असू नये. मग नोटरी केलेल्या इच्छापत्राची एक प्रत ही custodian कडे जमा करायची आहे. माझ्या जनहित याचिकेतील मागणी नुसार महाराष्ट्र सरकारने ०६.०३.०२०२४ रोजी ४१३ कस्टोडियन राज्यभरात नेमले आहेत. तसेच मुंबई महानगर पालिकेने जवळ जवळ प्रत्येक वॉर्डच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना कस्टोडियन म्हणून नेमले आहे. आपल्या मूळ प्रतिवर कस्टोडियन यांचा सही, शिक्का घेऊन आणि त्यांना एक प्रत दिली की एक नागरिक म्हणून आपले काम झाले. आता या शिक्का असलेल्या मूळ परतीच्या झेरॉक्स काढून त्या executor म्हणून नेमलेल्या नातेवाईकांकडे देऊन ठेवणे हे उत्तम.

**आगामी काळात या व्यवस्थेत काही बदल संभवतात का?**

इच्छापत्रांचे संकलन digitised असावे जेणे करून कधीही त्यांची सत्यासत्यात पडताळता येईल अशी माझी मागणी न्यायालयाने मान्य केली. महाराष्ट्र सरकारने त्यावर चार महिन्यांची मुदत घेतली असून ती मुदत ऑगस्ट महिन्यात संपते. ही व्यवस्था कशा प्रकारे करता येईल या विषयी मी माझे मत दिले आहे. माझ्या मते तरी सध्या ज्या प्रकारे लग्नाचे रजिस्ट्रेशन होते त्याच फॉरमॅटचा वापर करून सरकारला कुठलाही खर्च न करता ही व्यवस्था निर्माण करता येईल. या मध्ये नागरिक संकेत स्थळावर जाऊन फॉर्म भरून, आवश्यक ती कागदपत्रे (आधार कार्ड इत्यादी), आपल्या पूर्ण विरामाच्या इच्छापत्राची प्रत अपलोड करतील. त्यांना तिथेच कुठल्या ऑफिसमध्ये आणि कधी जायचे आहे ही पावती मिळेल. त्या वेळी त्या कस्टोडियन समोर जाऊन कागद पत्रांची पडताळणी करून झाली की संकेत स्थळावरूनच नागरिक आपली प्रत डाउनलोड करू शकतील. आगामी काळात अशी व्यवस्था उभी राहील अशी आशा करायला हरकत नसावी.

**इच्छापत्राची नोंद झाली. पुढे काय?**

या इच्छापत्राची प्रत जवळच्या नातेवाईकांकडे देऊन ठेवणे हे अर्थातच आवश्यक आहे. ज्या वेळी अशी व्यक्ती दुर्धर आजारी असेल, तेव्हा ती व्यक्ती स्वतः डॉक्टरांना सांगेलच. पण जर त्या व्यक्तीची शुध्द हरपली असेल आणि डॉक्टरांनी नातेवाईकांना परिस्थिती गंभीर असून यातून बाहेर निघणे कठीण आहे, अशी कल्पना दिली तर तेव्हा नातेवाइकांनी या इच्छापत्राची प्रत डॉक्टरना दाखवणे आवश्यक आहे. त्यानंतर वरती ५ क्रमांकाच्या मुद्द्यात उल्लेख केल्याप्रमाणे डॉक्टरांची कमिटी निर्णय घेऊन मरण लांबवणारे नाहक उपचार बंद करण्याचा निर्णय डॉक्टर घेतील.

**माझा आत्तापर्यंतचा अनुभव:**

मी स्वतःचे पूर्णविरामाचे इच्छापत्र बनवल्या नंतर त्या विषयी जनजागृती वेगवेगळ्या व्याख्यानांतून आणि माध्यमांतून सुरू केली. असे फारच कमी लोक होते ज्यांना हा मुद्दा पटला नाही. शंभरेक लोकांनी आपली इच्छापत्रे करून ती कस्टोडियनकडे जमा सुध्दा करून टाकली. माहिती मिळणे, तिचे आकलन होणे आणि ती पटणे हे सहज झाले तरी त्यावर प्रत्यक्षात कारवाई करण्यासाठी मात्र लोक टाळाटाळ करतात, असा अनुभव आहे. त्यातून मृत्यू विषयीचे काहीही बोलणे हा विषय अपरिहार्य असला तरी अप्रिय पण आहे. काही मंडळींना हा विषय आपल्या घरातील वडीलधाऱ्या वृध्द व्यक्तींसमोर कसा मांडावा, हा प्रश्न पडलेला आहे. काही जण सध्या धडधाकट असल्याने 'वेळ आल्यावर करू' अशा मनःस्थितिमध्ये आहेत. 'विषय महत्त्वाचा आहे पण अर्जंट नाही' यामुळे काही लोक जसे विमा उतरवणे किंवा संपत्तीचे बाबतचे मृत्यूपत्र करणे पुढे ढकलतात त्यातीलच हा प्रकार. अनेक लोकांना काय करायचे हे कळले असले तरी त्यांच्या शहरात, गावात नेमके कोण अधिकारी कस्टोडियन आहेत आणि कुठे आहेत याची माहिती त्यांना नाही. म्हणूनच हा मुद्दा मी कोर्टसमोर आणला असून या विषयीची जनजागृती सरकारने केली पाहिजे, हे ठासून मांडले आहे. माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार फक्त ४% नगरपालिकांनी या विषयी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात दिली आहे. अजूनही जवळजवळ ९९% जनतेला मुळात आपल्या देशात इच्छामरणाचा अधिकार आपल्याला आहे, हेच ठाऊक नाही.

**'ग्राहक'चे वाचक काय करू शकतात?**

१) मुद्दा पटला असेल तर स्वतःचे पूर्णविरामचे इच्छापत्र बनवू शकतात.

२) जवळच्या नातेवाईकांना, मित्र मैत्रिणींना त्याबद्दल माहिती देऊ शकतात आणि मदत करू शकतात.

३) सोसायटी किंवा मंडळांमध्ये त्यावर चर्चा करून हा विषय इतरांसामोर पोहोचवू शकतात.

४) आपल्या जनप्रतिनिधींना याची गरज आणि गांभीर्य पटवून देऊन एक रेटा निर्माण करू शकतात. इंटरनेट माध्यमांतून ही माहिती लोकांपर्यंत पोहोचवू शकतात.

५) ग्राहक पंचायतीचे कार्यकर्ते सजगपणे जर या विषयाचा पाठपुरावा करू लागले तर लवकरच पूर्ण यंत्रणा तयार होईल आणि लाखों लोकांना इच्छामरणाचा अधिकार बजावणे शक्य होईल.

‘बँकिंग’बद्दल बोलूया

# दाव्याविना पडून राहिलेली आर्थिक मालमत्ता

– अभय दातार

८० हजार कोटी, ८८ हजार कोटी, २५ हजार कोटी, ३ हजार कोटी, ९ हजार कोटी .... अबबबबब, इतके मोठमोठे आकडे वाचूनच डोळे पांढरे झाले ना? हे नक्की काय आहे असा तुम्हाला प्रश्न पडला असेल. हे आकडे आपणा सर्वांशीच या ना त्या प्रकारे संबंधित आहेत असे सांगितले तर तुम्हाला धक्का बसेल. पण वाचकहो, हे कटू सत्य आहे. हे आकडे आहेत दाव्याविना पडून राहिलेल्या रकमांचे; आणि ते अनुक्रमे बँक आणि पोस्ट ठेवी, शेअर्स, विमा, म्युच्युअल फंड आणि कर्मचारी भविष्य निर्वाह निधी यांच्याशी संबंधित आहेत. ही एकत्रित रक्कम सुमारे दोन लाख कोटींच्या घरात जाते.

हे असे का घडते? तर त्याला कारण आपली अनास्था, आपले अज्ञान. इतकेच नव्हे, तर खुद्द आपल्याच लोकांपासून अशा महत्त्वाच्या गोष्टी दडवून ठेवण्याची काहीजणांची वृत्ती. होय, हेही कारण आहे आणि मी ते स्वत: बँकेत असताना अनुभवले आहे. माझे बचत खात्यात इतके पैसे आहेत, मी मुदत ठेवींमध्ये तितके पैसे गुंतवले आहेत, हे माझ्या घरच्या लोकांना कळू देऊ नका, घरी कोणतेही पत्र पाठवू नका असे सांगणारे ग्राहक भेटले आहेत. अर्थात या गोष्टीला बरीच वर्षे झाली. आणि आता तर प्रत्येक गोष्टीसाठी नामनिर्देशन करावे लागते. ते करायचे नसेल, तर तशी स्पष्ट सूचना द्यावी लागते.

आपण जी काही गुंतवणूक केली आहे, तिच्या व्यवस्थित नोंदी ठेवणे, त्या महिन्यातून एकदा तरी तपासणे, त्याबद्दल कुटुंबातील सर्वांना माहिती देणे हे आपले कर्तव्य आहे. या नोंदी कशा असाव्यात? आपल्या बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक, मुदत ठेवी, असल्यास लॉकर, कर्जे इत्यादी. अनेक वर्षांपूर्वी बँकांचे संगणकीकरण झाले. त्यावेळी विशिष्ट ग्राहक क्रमांक ही संकल्पना अस्तित्वात आली. त्यामुळे आता बँकेतील सर्व खात्यांची माहिती न देता फक्त हा विशिष्ट ग्राहक क्रमांक नोंदवून ठेवला तरी चालेल. जी गोष्ट बँक खात्यांबद्दल, तीच विमा, म्युच्युअल फंड, शेअर्स, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, यांतील गुंतवणूक व बचतीबाबतही लागू होते.



जेव्हा एखादी व्यक्ती मरण पावते आणि तिच्या घरच्यांना त्या व्यक्तीने केलेल्या गुंतवणुकीबाबत काहीही माहिती नसते, कुठेही नोंदी ठेवलेल्या नसतात, तेव्हा त्या रकमेवर दावा सांगायला कोणी पुढे येऊ शकत नाही. ही रक्कम जर सलग दहा वर्षे तशीच पडून राहिली, तर ती रिझर्व बँकेच्या Depositors Education and Awareness Fund मध्ये जमा करणे सर्व बँकांना बंधनकारक आहे. हल्ली नवीन पिढी पटापट नोकऱ्या बदलते. बऱ्याचदा असे होते की, नवीन कंपनीत रुजू झाल्यावर पगार जमा होण्यासाठी ती कंपनी सांगेल त्या बँकेत खाते उघडावे लागते. आधीच्या काही कंपन्यांतसुध्दा हे झाले असण्याची शक्यता असते. त्यामुळे खरे तर एकदा कंपनी सोडली की ते खाते बंद करणे श्रेयस्कर. तसेच आपण आधीचे घर सोडून दुसरीकडे राहायला गेलो असू, तर तिथेही जवळच्या बँकेत नवीन खाते उघडले जाते. आधीच्या बँकेला आपला बदललेला पत्ता कळवायला पाहिजे. पण ‘पाहूया नंतर कधीतरी’ हा विचार असतो आणि ते ‘कधीतरी’ नंतर कधीच होत नाही.

याच जोडीला आधीच्या कंपनीत आपल्या पगारातील हिस्सा कर्मचारी भविष्य निर्वाह निधीत जमा होत असेल, आणि नवीन कंपनीतही तीच पध्दत असेल, तर तसे या निधीच्या संबंधित कार्यालयात लेखी द्यावे लागते. खरे तर आपला हिस्सा नियमितपणे जमा होत आहे किंवा नाही ते अधूनमधून तपासण्याची जबाबदारी एक नोकरदार या नात्याने आपलीही आहे. या खात्यासाठीही नामनिर्देशन करावे लागते. आपण जेव्हा अविवाहित असतो, तेव्हा आईच्या किंवा वडिलांच्या नावाने असे नामनिर्देशन केलेले असते. साधारणत: लग्न झाल्यावर आपल्या नवऱ्याचे/बायकोचे नाव तिथे बदलून घ्यावे. पण अनेकदा हे होत

नाही. काही जणांचे आईवडील मयत झालेले असतात. तरीही त्यांचीच नावे वारस म्हणून असतात. अशावेळी आपल्या पश्चात जेव्हा आपली पत्नी किंवा नवरा दावा दाखल करायला जातो, तेव्हा नाहक हेलपाटे घालावे लागतात. आणि अशी काही गुंतवणूक आहे याचा पत्ता जोडीदाराला नसेल, तर ती रक्कम दाव्याविना पडून राहते. हीच गोष्ट विम्याबाबतही होते.

दाव्याविना पडून राहिलेल्या रकमेने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केल्यावर संबंधित यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या. ग्राहक संघटनांचा दबाव वाढू लागला. त्यामुळे जन्म झाला 'उद्गम' या संकेतस्थळाचा. रिझर्व बँकेने विकसित केलेले https://udgam.rbi.org.in/unclaimed-deposits/#/login हे संकेतस्थळ अशा रकमा शोधायची सुविधा देते. हे संकेतस्थळ वापरण्यासाठी आपल्याला युजर आयडीची नोंद करावी लागते. सध्या एकूण ३० बँकांनी यात सहभाग घेतला आहे. या बँका विनादावा पडून राहिलेल्या रकमांचा तपशील या संकेतस्थळावर टाकतात. या संकेतस्थळावर उजवीकडे कोपऱ्यात याचा वापर कसा करायचा त्याची तपशीलवार माहिती स्क्रीन शॉटसकट दिली आहे. वर ज्या डिफ – Depositors' Awareness and Education Fund निधीचा उल्लेख केलेला आहे, त्याचा वापर ग्राहक संस्थांना ग्राहक जागृतीसाठी करता येतो. मात्र या निधीत पैसे वर्ग झाले, म्हणजे ते परत मिळणारच नाहीत, असे नाही. ते मिळण्यासाठी काही विहित पध्दती आहे.

**वाचकहो, तुम्हीसुध्दा या संकेतस्थळाचा वापर करून आपली अशी काही रक्कम पडून राहिली आहे का त्याचा धांडोळा घ्या.**

**प्रिय वाचकहो, मागच्या लेखात आम्ही वारस नेमण्याचे महत्त्व विशद केले होते ते तुम्ही समजून घेतले का? ते समजले असेल तर...**

- **आपली जी काही गुंतवणूक आहे त्या प्रत्येक गुंतवणुकीसाठी तुम्ही नामनिर्देशन केले आहे ना?**
- **याचा सर्व तपशील तुम्ही व्यवस्थित लिहून काढला आहे का?**
- **हा सर्व तपशील तुम्ही तुमच्या कुटुंबियांना दाखवला आहे ना?**



## सिटी को.ऑप. बँक- याचिकेचे काम जोरात!

सिटी को-ऑपरेटिव्ह बँक ठेवीदारांतर्फे आपण एक टेस्ट केस म्हणून या बँकेच्या संचालक मंडळाविरुध्द राष्ट्रीय ग्राहक आयोगात नुकसानभरपाई साठी याचिका दाखल करणार आहोत. त्यासाठी आजवर ३०० हून अधिक ठेवीदारांनी त्यांचे पेपर्स सादर केले असून त्याची संपूर्ण पडताळणी आपल्या तक्रार केंद्रातील कार्यकर्ते किरण परांजपे, किरण करमरकर, कारंजकर, अनिल ठोसर आणि पूर्णिमा राव यांनी नुकतीच पूर्ण केली आहे. किरण परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली हे संपूर्ण काम या टीमने अत्यंत पध्दतशीरपणे आणि व्यवस्थितपणे केले आहे, याचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. राष्ट्रीय आयोगात दाखल करायच्या याचिकेवर ॲड. शिरीष देशपांडे आणि डॉ. अर्चना सबनीस काम करत आहेत.

## न्यू इंडिया बँक- जनहित याचिकेची तयारी

न्यू इंडिया को ऑफ बँक ठेवीदारांतर्फे उच्च न्यायालयात सादर करण्यात येणाऱ्या आपल्या जनहित याचिकेला अंतिम स्वरूप देण्यात येत आहे. याचिके संदर्भात माहिती, कागदपत्र देण्याचे काम ॲड. शिरीष देशपांडे आणि ॲड. पूजा जोशी-देशपांडे करत असून याप्रकरणी उच्च न्यायालयात आपली बाजू ॲड. अभिनव चंद्रचूड आणि ॲड. प्रतीक मांडतील. ॲड. अभिनव चंद्रचूड यांनी ही जबाबदारी विनामोबदला स्वीकारली आहे.




## चेंबूर येथील पेठेचा कालावधी बदलला

काही अपरिहार्य कारणामुळे चेंबूर येथे १ ते ५ ऑगस्ट २०२५ ह्या कालावधीत आयोजित केलेली पंचायत पेठ सध्या रद्द करण्यात आली आहे. नवीन तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल.

## ग्राहक पंचायत पेठ पालघर २०२५-२६

**७ ते ११ ऑगस्ट २०२५ | लायन्स क्लब, पालघर (प)**

येथे आयोजित होणाऱ्या या पंचायत पेठेची आपण सर्वच उत्सुकतेने वाट बघत असाल. वैविध्यानी नटलेली ही पंचायत पेठ खूप नाविन्यपूर्ण नजराणा घेऊन साजरी होणार आहे. ह्या पंचायत पेठेला भेट देण्यासाठी आग्रहाचे निमंत्रण.





सेतू बांधा रे

## या विशेष पेठेचे आयोजन

सालाबादप्रमाणे 'सेतू बांधा रे!' या विशेष पेठेचा उपक्रम २६ ते २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत सिंफनी बँक्वेट, अंधेरी (पूर्व) येथे आयोजित करण्यात आली आहे. समाजातील वंचित घटकासाठी काम करणाऱ्या संस्थांची ही पेठ असून दिवाळीच्या निमित्ताने आकाश कंदिल, पणत्या, बॅग्ज इ. याच पेठेतून ग्राहकांनी खरेदी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



# ग्राहक पंचायत पेठ दालन तक्ता – पालघर २०२५-२६

| क्र. | स्टॉलचे नाव | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| १. | श्री सिल्क | कांजीवरम, टिशू सिल्क सारीज |
| २. | सोलरॅप | इरकल, कॉटन सिल्क, संबलपुरी, कशिदा वर्क, प्युअर कॉटन साड्या |
| ३. | सदाफुली | महेश्वरी, चंदेरी, हॅण्ड पेंटेड सारीज, लिनन कॉटन ब्लाऊज इ. |
| ४. | अथर्व कलेक्शन | जामदानी, कोरा, बनारसी, कोसा सिल्क साड्या, रेडिमेड ब्लाऊज |
| ५. | श्वेता कलेक्शन | टसर, रॉसिक, कोटा, कॉटन, नववारी इ. साड्या |
| ६. | सिमरन कलेक्शन | विविध प्रकारचे प्लाझो सेट, डिझाईनर विविध कुर्तीज |
| ७. | मयुरा कलेक्शन | शॉर्ट टॉप, स्लिव्हलेस टॉप, वनपीस स्पॅगेटी इ. |
| ८. | नारी बुटिक | शॉर्ट अॅण्ड लॉंग कुर्तीज् पुरुष व स्त्रियांसाठी शर्टस् |
| ९. | अनुराधाज् कलेक्शन | महेश्वरी, प्युअर सिल्क, कॉटन ड्रेस मटेरियल |
| १०. | मृणाक्षी लखनवी | सर्व प्रकारचे कॉटन, मल, मोडाल, चंदेरी, जॉर्जेट, मसलीन लखनवी कुर्तीज |
| ११. | कायरा कलेक्शन | लेगिंग, जॅकेट्स, सिल्क कुर्तीज, दुपट्टा इ. |
| १२. | रमा कलेक्शन | कलमकारी, मंगलगिरी, संबळपुरी ड्रेस मटेरियल |
| १३. | हुगळी हँडीक्राफ्ट | कोलकाता ड्रेस मटेरिअल, साड्या, चादरी इ. |
| १४. | साशा कलेक्शन | हँडवर्क, क्रॅक, बाटिक, कॉटन, अजरख, एम्ब्रॉयडरी इ. ड्रेस मटेरियल |
| १५. | स्वस्तिक होजिअरी | लेडीज अंडरगार्मेंटस् |
| १६. | लुक अॅट मी | सर्व वयोगटासाठी नाईट सूटस् |
| १७. | मायलेकी | बाटिक, जयपूर गाऊन्स इ. |
| १८. | सजनी नाईटीज | विविध प्रकारचे गाऊन्स, नाईटी, हाफ गाऊन्स (वयस्कर स्त्रियांसाठी) इ. |
| १९. | डी.टी.निटवेअर | बनियन्स, ट्रॅकसूट, टी शर्टस्, सॉक्स इ. |
| २०. | भारतीय खादी सेंटर | लेंगे, झब्बे, शर्टस्, पंचे, हातरुमाल, जॅकेटस् इ. |
| २१. | अतरंगी टीशर्ट | मराठी कॅलीग्राफिक टीशर्टस् |
| २२. | महाटेक्स | टॉवेल, सतरंज्या, दोहर, साड्या इ. |
| २३. | नागपूर स्पेशल | बेडशीट, चादरी, पिलो कव्हर्स, सतरंजी इ. |
| २४. | आर.आर.क्रिएशन | सोलापूरी चादरी, जयपूरी दोहर, रजाई, दिवाण सेट इ. |
| २५. | पल्लवी कव्हर्स | सोफा, फ्रीज हँडल, टॉप, मिक्सर, साडी कव्हर्स इ. |
| २६. | निद्रा क्रिएशन्स – सुजलाम बेडस्प्रेड | मेंढीची लोकर आणि आयुर्वेदिक वनस्पती वापरून केलेल्या गाद्या व उशा इ. |
| २७. | मल्हार क्रिएशन्स | बाळाचे कपडे, दुपटी, टोपी, लहान मुलांचे कपडे इ. |





| क्र. | स्टॉलचे नाव | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| २८. | टायनी गिगल्स् | डंगरी, फ्रॉक, पँट इ. लहान मुलांचे कपडे |
| २९. | शितल बॅग्ज | विविध प्रकारच्या पर्सेस, बॅग्ज इ. |
| ३०. | विकास लेदर वर्क्स | लेदर पर्सेस, पाऊच, लेदर जॅकेट, बेल्ट इ. |
| ३१. | उद्यमिता | महिला बचत गटांनी बनवलेल्या पर्सेस, फोल्डर्स इ. |
| ३२. | शिवम् बॅग्ज | पर्सेस व बॅग्ज् |
| ३३. | श्री महालक्ष्मी आर्टस् | पारंपरिक व ॲण्टिक ज्वेलरी |
| ३४. | ट्रॅडिशनल ऑर्नमेंटस् | इमिटेशन ज्वेलरी, आर्टिफिशल ज्वेलरी इ. |
| ३५. | स्वाती क्रिएशन्स | डिझायनर, इमिटेशन ज्वेलरी |
| ३६. | ब्लॉसम ॲण्ड इन्सेंस | परफ्यूम्स |
| ३७. | अनुयोग इन्सेंस | विविध प्रकारची अत्तरे, सुगंधी अगरबत्ती, धूप, फ्रेशनर इ. |
| ३८. | विन आर्ट ॲण्ड क्राफ्ट | कागदापासून बनविलेले गणपती मखर, सजावटीचे साहित्य |
| ३९. | झासा ग्लास आर्टिफॅक्टस् | काचेचे दिवे, पूजा सेटस्, अत्तरदाणी इ. |
| ४०. | हरि ओम वुड वर्क्स | लाकडाच्या विविध कलात्मक वस्तू, फायबर मूर्ती, देव्हारे, पाट |
| ४१. | एन्थु फॉर आर्ट | कॅनव्हॉस फ्रेम, लाकडी टेबल टॉप, फ्रीज मॅगनेट्स |
| ४२. | अखंडज्योत | टाळ, घंटी, झांज, पुजेचे साहित्य इ. |
| ४३. | नेचर्स वूड | सावंतवाडी स्पेशल लाकडी खेळणी |
| ४४. | शीलाताई फूड प्रॉडक्टस् | लोणचे- ओली हळद, मोडमेथी, सरबत- कैरी, आवळा, आंबा, जॅम इ. |
| ४५. | मे. पोशिंदा न्युट्रिशनल प्रॉडक्टस् | सर्व प्रकारचे मध- सूर्यफूल, बाभुळ इ. |
| ४६. | कर्णिक कृषी उद्योग | गुलकंद, हार्टिका, शेजवान चटणी, मिसळ, पावभाजी मसाला इ. |
| ४७. | श्री विनायक एंटरप्रायझेस | घरगुती सफाईचे विविध ब्रश |
| ४८. | महालक्ष्मी एंटरप्रायझेस | किचन वेअर्स |
| ४९. | गेबी क्लिनिंग | साफ सफाईची उत्पादने |
| ५०. | विनय एंटरप्रायझेस | किचनमधील विविध आकर्षक गृहोपयोगी स्टॅण्डस् होल्डर इ. |
| ५१. | वंश गार्डन इनोव्हेटीव्हज् | फोल्डींग चटया, फोल्डींग वेताचे पडदे |
| ५२. | ओमकार मार्केटींग | हार्ड ॲनोडाइज्ड किचन वेअर्स, कास्ट आयर्न (बिडाची) भांडी |
| ५३. | एस.के. एंटरप्रायझेस | फोल्डिंग टेबल्स |
| ५४. | स्पायका होम ॲण्ड हायजिन प्रॉ. | घरगुती साफ सफाईची उत्पादने |
| ५५. | स्टेप इन वॉक शूज | विविध डिझाईन्सच्या चप्पलस्, सॅडल्स, शूज इ. |






चाणाक्ष ग्राहक

# पाकिटबंद खाऊ घेण्यापूर्वी...

– **अंजली पोतदार**

एप्रिल महिन्यातली गोष्ट आहे. कोकणातून तेजस ट्रेनने मुंबईला परत येत होते. ट्रेनने चिपळूण स्टेशन सोडले आणि ५-७ मिनिटांतच आमच्या डब्याच्या दरवाजाबाहेर काहीतरी गडबड सुरू झाली. गाडी एसी चेअरकार होती. “पकडो उसको, अभी किधर भागता है” असेही ऐकू आले. मला वाटले कोणीतरी पाकिटमाराला पकडले असावे म्हणून थोडे दुर्लक्ष केले. पण ते भांडण वाढतच गेले. उत्सुकता स्वस्थ बसू देईना म्हणून पुढे जाऊन बघितले तर काय! झालं होतं असं......

एक प्रवासी जे चिपळूणला चढले ते एका वेफर, कुरकुरे विकणाऱ्या IRCTC चा टीशर्ट घातलेल्या विक्रेत्याला बघून चमकले आणि तो विक्रेताही त्यांना बघून चमकला आणि तिथून पळून दुसऱ्या डब्यात धावला. दुसऱ्या डब्यात जाऊन त्याने आपली डोक्यावरची टोपी लपवली, टीशर्ट काढून टाकला आणि आतल्या दुसऱ्या शर्टवर एखाद्या प्रवाशासारखा साळसूदपणे बसून राहिला. म्हणूनच तो चिपळूणला चढलेला प्रवासी "पकडो उसको" असे ओरडत होता कारण तो कोकणात जाणारा नियमित प्रवासी होता. गेल्याच आठवड्यात त्याने ह्याच विक्रेत्याला पकडून रेल्वे पोलिसांच्या हवाली केलेले. तो विक्रेता IRCTC चा अधिकृत विक्रेता नव्हताच मुळी. त्याच्याकडील सर्व माल मुदत संपून एक्सपायर झालेला होता. त्या ट्रेनमधला जो IRCTC चा मॅनेजर होता तो त्या विक्रेत्याकडून पैसे घेऊन त्याला जुना टीशर्ट देऊन हा मुदत संपलेला माल ट्रेनमध्ये विकायची परवानगी देत होता. म्हणूनच तो मॅनेजर, विक्रेता आणि प्रवासी ह्यांचा भांडण चालू होतं. शेवटी त्या विक्रेत्याला त्याच्या टोपलीसकट प्रवाशांनी पकडून आणला, टीसी ला बोलावलं, खाद्यपदार्थांच्या पाकिटाचे फोटो काढले आणि टीसी कडे लेखी तक्रार केली. तेवढ्यात पनवेल स्टेशन आले. ह्या विक्रेत्याला रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिलं गेलं.

आता मे, जून शाळेला सुट्टी म्हणून आणि जुलै, ऑगस्ट पावसाळा म्हणून शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी ट्रेनने कोकणात जातात. गप्पा मारताना टाईमपास म्हणून ह्या विक्रेत्यांकडील पाकिटबंद खाद्यपदार्थ मोठ्या विश्वासाने घेतात. उघड्यावरील अन्न नको म्हणून लहान मुलांनाही पाकिटबंद खाऊ देण्याकडे पालकांचा कल असतो त्यामुळे त्याच्यावरची माहिती वाचण्याच्या भानगडीत कोणी पडतच नाही म्हणून मुद्दाम हा प्रसंग सांगितला. मग ह्या पाकिटांवर अन्नसुरक्षा मानके प्राधिकरणाचे (FSSAI) नियम काय आहेत, तसेच ग्राहकाने काय खबरदारी घेतली पाहिजे, ते थोडक्यात पाहू :

**पाकिटबंद खाद्यपदार्थांच्या वेष्टनावर अनिवार्य असलेल्या गोष्टी म्हणजे -**




१) अन्नउत्पादनाचे नाव
२) घटक पदार्थांची यादी
३) निव्वळ वजन
४) अधिकतम किरकोळ किंमत
५) उत्पादकाचे नाव, पत्ता
६) कालबाह्यता किंवा वापरानुसार तारीख
७) FSSAI चा लोगो आणि परवानाक्रमांक

हे निकष ग्राहकांसाठी उत्पादनाची सुरक्षितता, गुणवत्ता आणि पारदर्शकता सुनिश्चित करतात. ही माहिती PDP म्हणजे प्रिंसिपल

डिस्प्ले पॅनलवर असणे आवश्यक आहे. हा पाकिटाचा समोरचा भाग. IP म्हणजे इन्फॉर्मशन पॅनल हा पाकिटाचा मागचा किंवा बाजूचा भाग. ह्यावर पोषणमूल्य आणि वापराच्या सूचना यासारखा तपशील असतो. FSSAI च्या नियमानुसार उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या घटकांची यादी त्यांच्या वजनाच्या किंवा प्रमाणाच्या उतरत्या क्रमाने करणे आवश्यक आहे. जर उत्पादनात प्रिसेर्वेटिव्हस, रंग किंवा चव वाढवणारे पदार्थ असतील तर ते लिहिणे आवश्यक आहे. आयात केलेल्या उत्पादनांसाठी मूळ देश विशेषतः महत्त्वाचा आहे.

ही सर्व माहिती केवळ ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी असते. मग आपले आरोग्य सुरक्षित राखण्याचे ग्राहकाचे कर्तव्य आपण बजावणे आवश्यक नाही का? कुठलाही पाकिटबंद खाद्यपदार्थ घेताना आपण ही माहिती वाचून मगच खरेदी करणं हा यावरचा सर्वोत्तम उपाय आहे.

**वाचू आनंदे**

## जनामनातला माणूस निळू फुले




**लेखक:** रजनीश जोशी | **इंडस सोर्स बुक्स**

**मूल्य:** ₹३२५/- **वाटपातील किंमत:** ₹२१८/-

ज्यांनी निळू फुले यांची रंगभूमी आणि चित्रपटातील कारकीर्द अनुभवली आहे, त्यांच्यासाठी स्मरण-रंजन तसेच या दिग्गज अभिनेत्यातील संवेदनशील माणसाचा परिचय घडविणारे हे पुस्तक आहे.

पाच दशके मराठी रंगभूमी आणि चित्रपट सृष्टी गाजवणारे निळू फुले वाढत्या वयात डॉ. लोहिया यांची विचारधारा ऐकत मोठे झाले. आणीबाणी लागू झाल्यावर तिच्या विरोधात त्यांनी काम केले.

सेवादलाचे कलापथक आणि 'कथा अकलेच्या कांद्याची'चे गाजलेले प्रयोग यामुळे संस्कृति-रक्षकांचा रोष ओढवून घेणाऱ्या 'सखाराम बाईडर' मधील सखाराम साकारण्याची संधी मिळाली. हा विजय तेंडुलकरांचा सखाराम त्यांनी कसा समजून घेतला त्याविषयी वाचताना, अभिनेता भूमिकेचा विचार कसा कसा करू शकतो, हे आपल्या लक्षात येते. त्यांनी साकारलेल्या 'सखारामा'ला डॉ. श्रीराम लागू आणि पु. ल. देशपांडे यांच्याकडून मिळालेली शाबासकीची थाप – कौतुकाचे शब्द निळूभाऊंनी अत्यंत विनयपूर्वक स्वीकारले. हे सगळे मुळातून वाचण्यासारखे आहे.

नाटकाची पार्श्वभूमी घेऊन चित्रपटात आल्यावर तिथली तंत्रे किती समर्थपणे त्यांनी आत्मसात केली, याची साक्ष पिंजरा आणि सामना या दोन चित्रपटातील त्यांच्या अभिनयातून मिळते. त्यानी अनेक चित्रपटात भूमिका केल्या. हिंदीत सुध्दा कुली सारख्या गाजलेल्या चित्रपटात सहृदय हमाल त्यांनी साकारला. त्यांचे सामाजिक भान आणि गोर-गरीबांविषयीचा कळवळा यापोटी ते 'हमाल पंचायत', 'एक गाव एक पाणवठा', 'अंधश्रध्दा निर्मूलन'या सारख्या अनेक उपक्रमात सहभागी झाले. साधी राहणी स्वीकारून समाज-प्रबोधनार्थ संघर्ष करीत ते अभिनयाच्या क्षेत्रात आख्यायिका बनून राहिले. हा जीवन प्रवास वाचणे, समजून घेणे प्रेरक ठरेल.

– **वसुंधरा देवधर**

## श्रद्धांजली



मुंबई ग्राहक पंचायत बोरीवली विभागाचे ज्येष्ठ कार्यकर्ते मधुकर प्रभू यांचे २३ मे रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. प्रभू सर अत्यंत शिस्तबध्द व तत्त्वाने काम करणारे होते. बोरीवली विभागाचे तक्रार मार्गदर्शन केंद्र ते चालवत असतांना त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे अनेक ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण झाले होते. बोरिवलीच्या ग्राहक पंचायत पेठेमध्येही ते अत्यंत चोख व सचोटीने काम करत. त्यांच्या कॉसमॉस गार्डन संघाला बोरिवली विभागाकडून उत्कृष्ठ संघाचा पुरस्कार मिळाला होता.

त्यांनी आपले देहदान करून आपल्या देहाचा पण सामाजिक कार्यासाठी वापर केला. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.



मुंबई ग्राहक पंचायत बोरीवली विभागाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या माया कामथ यांचे १ जूनला अल्पशा आजाराने निधन झाले. विभागाच्या खजिनदार म्हणून काम करताना त्यांनी आपले आर्थिक व्यवहार चोख ठेवले होते. त्या नवीन व जुने कार्यकर्ते व पदाधिकारी यांना संस्थेचे, विभागाचे व बँकेचे नियम पाळण्याचे भान हलकंफुलकं बोलून करून देत असत. त्या संघप्रमुख असलेल्या कोयना संघाला बोरिवली विभागाकडून उत्कृष्ठ संघाचा पुरस्कार मिळाला होता. १४ फेब्रुवारीला बोरिवली विभागाने त्यांचा ७५ वा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला होता.

# जुन्या इमारतींचा पुनर्विकास उपयुक्त कार्यक्रम

– **शिल्पा सोवनी, कार्यवाह, पुणे विभाग**



मुंबई ग्राहक पंचायतीच्या पुणे विभागाने १५ मार्च, जागतिक ग्राहक हक्कदिनी जुन्या इमारतींचा पुनर्विकास व रखडलेले गृहप्रकल्प या संबंधीचे ग्राहकांचे प्रश्न, शंका, समस्या समजून घेऊन, निराकरण करणे, मार्गदर्शन करणे असा कार्यक्रम केला. रेरा सलोखा मंचाचे पुण्यातील अनुभवी सदस्य शिरीष मुळेकर, कल्पिता रानडे व तनुजा रहाणे या आमंत्रितांचे स्वागत व परिचय पुणे विभाग कार्याध्यक्षा शर्मिला पुणतांबेकर यांनी उपस्थितांना करून दिला.

सलोखा मंचाच्या अनुभवी सदस्या तनुजा रहाणे व कल्पिता रानडे यांनी महारेराची ओळख, सलोखा मंचाच्या कामाची पध्दत व सलोखा मंचामुळे कसे फायदे होतात, याची थोडक्यात माहिती करून दिली. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्यांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने सलोखा मंच सदस्यांनी इमारतींच्या पुनर्विकासासंबंधीच्या अनेक गोष्टींची माहिती उपस्थितांना देऊन उपस्थितांच्या प्रश्नांची स्पष्ट व सहज उकल केली.

या कार्यक्रमाला ४५ सदस्य उपस्थित होते. उपस्थितांमधून अशी सूचनाही आली की, इमारत बांधकाम व पुनर्विकास या विषयात अज्ञानामुळे अनेक सामान्यांची फसवणूक व लुबाडणूक होते. मुंबई ग्राहक पंचायतीने यासाठी कायदेतज्ज्ञ व वास्तुविशारद यांचा समावेश असलेले कायमस्वरूपी सशुल्क सल्ला केंद्र उभारावे, जेणेकरून सर्वसामान्यांची फरफट होणार नाही.

कार्यक्रमाला संस्थेच्या विश्वस्त ललिताताई कुलकर्णी, पुणे विभाग सल्लागार छायाताई वारंगे व पुणे विभाग समितीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. पुणे विभाग कार्यवाह सुप्रिया बर्वे यांनी आभार व्यक्त केले.

## मसाल्यांवर रंजक मार्गदर्शन

– जयश्री वानखेडे

शनिवार, २६ एप्रिल रोजी महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड (ऐरोली शाखा) येथे ‘मैत्री विभागा’तर्फे 'मसाल्या संबंधित आख्यान' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुंबई ग्राहक पंचायत खरेदी समिती उपाध्यक्षा छाया वारंगे यांना निमंत्रित केले गेले होते.

भारतीय संस्कृतीत मसाले आणि ती वापरण्याची प्राचीन परंपरा आहे व या परंपरेला आरोग्य, अन्न संरक्षण, अन्न सुरक्षा, सौंदर्य, अन्नरूची असे वेगवेगळे आयाम आहेत. भारताची मसाल्यांची वेगळी परंपरा आहे आणि ती उत्तरे पासून दक्षिणे पर्यंत वापरण्याच्या पध्दतीनुसार खूप वैविध्यपूर्ण आहे. मसाल्याची भारतीय संकृती व परंपरा विशद करत छाया ताईंनी मसाल्याचा इतिहास फार रंजक पध्दतीने सांगितला. मुंबई ग्राहक पंचायतीच्या वितरण व्यवस्थेसाठी वर्षाच्या साठवणीच्या मसाल्यांची पारख, निवड, आवश्यकता, याबद्दल सखोल माहिती सांगताना, एखादा मसाला निवडताना तो त्या मसाल्याच्या वेगवेगळ्या आयामांचा विचार करून घ्यावा, हे सांगताना व्यवसायिक मसाले उद्योजक काय व का करतात, हेही स्पष्ट केले. आपण मसाले करण्यासाठी घटकपदार्थ खरेदी करतो तेव्हा कोणत्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे व का, हे छाया वारंगे यांनी अगदी सहज, सुलभ तरीही रंजकपणे मांडले. आरोग्य, औषधी गुणधर्म, अन्न संरक्षण या दृष्टीनेही मसाले महत्त्वाचे आहेत, हे समजावून सांगितले. उपस्थित मैत्रिणींनीही अगदी मनमोकळेपणाने मनात आलेले प्रश्न विचारत सुसंवाद साधत कार्यक्रमाचा आनंद घेतला.

मसाल्यांमध्ये भेसळ कशी होऊ शकते, नवे व जुने मसाले, तुटक्या मिरच्या, मिरच्यांवर पाणी का मारले जाते, लवंग काडी, धण्यांचे साल, काश्मीरी मिरची, राजापुरी खोबरे- हळद इ. सहज वापरल्या जाणाऱ्या शब्दांमागील रंजक गोष्टी सांगितल्या. हिंगाचे अन्नातील महत्त्व, आपण हिंग वापरतो त्यांची कथा, बांधाणी शब्दप्रयोग या मागील कथा ऐकून तर सर्वजण अचंबित झाल्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाराष्ट्र सेवा संघाच्या अध्यक्षा माधवी देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ऐरोलीच्या मुंबई ग्राहक पंचायतच्या कार्यकर्त्या जयश्री वानखेडे यांनी छाया वारंगे यांचा परिचय करून दिला. ‘तुम्ही पुन्हा या’ असा गोड आग्रह करत कार्यक्रमाची सांगता झाली.

## ‘बँकेसंदर्भात सर्व काही’

– वर्षा भुर्के, ठाणे विभाग

मुंबई ग्राहक पंचायत ठाणे विभागातर्फे ९ एप्रिल रोजी ‘अर्थ साक्षरता’ या विषयावर अभय दातार यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. उपस्थितांचे स्वागत विभागाच्या कार्याध्यक्ष हिरा अकोलकर यांनी केले. विभागाच्या अध्यक्षा मिनल टिपणीस यांनी संस्थेची व ठाणे विभागाची थोडक्यात माहिती सांगितली. त्यानंतर जयश्री वानखेडे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

अभय दातार यांनी शेड्युल बँका, राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, प्रायव्हेट बँकांची कार्यपध्दती, कार्यकाम याबद्दल माहिती दिली. बँकांची आर्थिक स्थिती कशी बघायची, नॉमिनेशन बद्दलचे नवीन बदल याबद्दलही त्यांनी सांगितले. न्यू इंडिया बँक ठेवीदारांच्या समस्येच्या निमित्ताने रिझर्व्ह बँकेच्या गाईडलाईन्सची माहिती त्यांनी दिली.

पुढे ते म्हणाले की, गुंतवणूक करताना ग्राहकांनी सर्वांगीण विचार करून किती जोखीम घेण्याची आपली मानसिकता आहे, हे ठरवून घेतले पाहिजे. म्युचुअल फंड, बाँड यांबाबत उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसन त्यांनी केले. या कार्यक्रमाला ४० जणांची उपस्थिती होती. संस्थेच्या कार्याची ओळख झाल्याने स्वयंप्रेरणेने दोघांनी सहयोगी सभासदत्व घेतले. वर्षा भुर्के यांनी आभार प्रदर्शन केले.

# प्लास्टिकची भयावह समस्या

– शिल्पा सोवनी, कार्यवाह, पुणे विभाग



पर्यावरण दिनानिमित्त ७ जून रोजी पुणे विभागाने 'एका प्लास्टिकची दुसरी गोष्ट' असा कार्यक्रम अंतर्नाद योग केंद्र येथे आयोजित केला होता.

ग्रीन वर्कस् ट्रस्टचे आकाश जोशी हे प्रमुख वक्ते होते. प्लास्टिकचा वापर हा हानिकारक आहे व त्याचे मानवी जीवनावर कसे दुष्परिणाम होत आहेत, हे त्यांनी प्रभावीपणे स्पष्ट केले. जमीन, पाणी, समुद्र, मानव, पशु, पक्षी, जलचर ह्या सर्वांवर प्लास्टिकचे घातक परिणाम होत आहेत, हे जोशी सरांनी प्रोजेक्टरच्या सहाय्याने सचित्र स्पष्ट केले. दिल्ली डंपिंग ग्राऊंडवरील कुतुबमिनारच्या उंची एवढा कचऱ्याचा ढीग, पॅसिफीक समुद्रात प्लास्टिकचा कचरा एकत्र येऊन त्याचे एक मोठे बेट तयार झाले आहे. अशी निरनिराळी उदाहरणे देऊन त्यांनी प्लास्टिकची समस्या किती भयावह आहे हे सांगितले.

डीग्रेड झालेल्या प्लास्टिकचे असंख्य डोळ्यांना न दिसणारे सूक्ष्म कण (मॅक्रोप्लास्टिक) सर्व प्राणीमात्रांच्या शरीरात सहजपणे शिरून घातक परिणाम करत आहेत. त्यामुळे जरी प्लास्टिकचे समूळ उच्चाटन शक्य नसले तरी प्रत्येक व्यक्तीने प्लास्टिकचा कमीत कमी वापर केला पाहिजे व घरात जमलेला प्लास्टिकचा कचरा प्लास्टिक रिसायकल करण्यासाठी नेणाऱ्या संस्थांना दिला पाहिजे, हे सर्वांनाच पटले.

त्यानंतर जनवाणी संस्थेचे उमेश भाग्यवंत व पूनम काळे ह्यांनी ते प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करून रिसायकलींग करणाऱ्या कंपन्याना द्यावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुणे विभाग कार्याध्यक्ष शर्मिला पुणतांबेकर यांनी केले. पाहुण्यांची ओळख सुप्रिया बर्वे यांनी करून दिली. कार्यक्रमाला पुणे महानगर पालिकेच्या नगरसेविका मंजुश्री खर्डेकर तसेच आपल्या संस्थेच्या विश्वस्त ललिता कुळकर्णी उपस्थित होत्या. कार्यवाह शिल्पा सोवनी यांनी सर्वांचे आभार मानले.

# गोरेगावात वेष्टण वाचन कार्यशाळा

– नेहा जोशी

१० मे २०२५ रोजी गोरेगाव येथे 'स्वरगंध' या संस्थेतर्फे वेष्टण वाचन हा कार्यक्रम संपन्न झाला. सुमारे ८० श्रोते उपस्थित होते. 'वाचाल तर वाचाल' या उक्तीप्रमाणे वेष्टण वाचनाचे महत्त्व या कार्यक्रमात शिक्षण विभागातर्फे शिक्षण विभाग प्रमुख मंगला गाडगीळ आणि कार्यकर्त्या नेहा जोशी यांनी उपस्थितांना सोदाहरण सांगितले. MRP, unit sale price, servings, allergens म्हणजे काय, cautions का वाचाव्यात, कुठली कुठली बोधचिन्ह खरेदी करताना बघायला हवीत, अशा अनेक गोष्टींची माहिती कार्यक्रमात दिली गेली. कार्यक्रमाच्या शेवटी मंगला गाडगीळ यांनी आपली वितरण व्यवस्था समजावून सांगत मुंबई ग्राहक पंचायत संस्थेची व ग्राहक चळवळीची माहिती दिली. संस्थेचे सभासदत्व घेण्यासाठी तसेच नवीन संघ स्थापन करण्याचे आवाहन श्रोत्यांना करण्यात आले. उत्तम नियोजित कार्यक्रमाची सांगता प्रश्नोत्तरांनी झाली.

# Be a Smarter Consumer in the wake of Influencers

– **Vasundhara Deodhar**

Have you seen a clip that lure you by telling a story and finally come up with a brand name? Have you heard a young girl in a cosmetic brand advert saying "Oh mom, you are my first influencer"? The potential of visuals and thoughtfully crafted simple stories is at its best in various social media platforms.

These reels are professionally made and attract the unsuspecting viewer who thinks that the content is truthful and created for the benefit of people at large. But be aware, it's a business model and a new profession in the world of social media. Look at the mind-boggling turn over and growth of the influencer business.

**From reels to riches – Instagram influencers**

Influencer marketing in India is witnessing exponential growth, with influencers earning an average monthly income ranging from ₹20,000 to ₹200,000. There are different categories of influencers - nano to mega. Mega influencers on Instagram emerge as financial powerhouses, commanding earnings ranging from 3 to 5 lakhs, surpassing their YouTube counterparts.

For the common consumer, influencer is defined as a 'third party who significantly shapes the customer's purchasing decision but may never be accountable for it.'

One needs to be aware that digital influence shapes decisions (w.r.to goods / services/ investments) and therefore it is essential for consumers to differentiate between genuine recommendations and paid promotions, recognize manipulative marketing tactics, and engage ethically in online interactions.

Here are some pointers to understand the sponsored and non-sponsored content – basically whether the influencer is getting paid or not.

**Indicators of Sponsored Content**

- Presence of hashtags like #Ad, #Sponsored, #PaidPartnership or platform disclosure tools.
- Direct mentions of promotional discounts, referral links, or special codes. • Content focused on selling a product rather than personal storytelling.
- Consistent brand partnerships with repeated endorsements.




**Non-Sponsored Content**

- Non-sponsored content consists of genuine recommendations that influencers share based on personal experience, without receiving compensation.

- This content reflects an influencer's true opinions and preferences rather than brand agreements.
- To maintain transparency, the Indian Influencer Governing Council (IIGC) encourages influencers to use #Admiration when posting non-sponsored endorsements.

**Before making a purchasing decision based on influencer recommendations, consumers should:**

- Check for disclosure: Look for hashtags like #Ad, #Sponsored, #PaidPartnership or mentions of free products.
- Analyse the influencer's language: If the content feels overly promotional or sales-driven, it is likely sponsored.
- Look at past endorsements: If an influencer frequently switches brands in the same category, their loyalty may be financially motivated.
- Evaluate the review depth: Non-sponsored content tends to provide a balanced perspective, while sponsored (meaning paid) content often lacks criticism.
- Research the product independently: Rely on multiple sources rather than a single influencer opinion.

One should know that the social media platforms are flooded with variety of influencer content and can make tremendous impact on non-suspecting consumer navigating through different social media posts.

There are types of the influncers like Fashion & Beauty Influencers, Fitness & Wellness Influencers, Finance & Business Influencers, Food & Travel Influencers, Parenting & Lifestyle Influencers, etc.

In spite of the standards and guidelines, violation of the same keeps on surfacing. The watch-dog Advertising Standards Council of India – ASCI – has a complaints' management system, through which the violations are reported to relevant authorities where ever required.

It will be helpful to know some important data regarding number of Ads – betting ads - found to be violating the law.

- 323 Instagram posts that promoted betting platforms were reported to the Ministry of Information and Broadcasting for further scrutiny.
- 225 Instagram posts that featured betting tickers redirecting viewers to offshore betting platforms were reported to the Ministry of Information and Broadcasting for further scrutiny.
- 138 digital posts featured influencers promoting an illegal betting platform, which were reported to the Ministry of Information and Broadcasting.
- 50 digital ads were escalated to the Ministry of AYUSH for violating the Drugs and Magic Remedies Act.

Please spread this as a caution message to all your near and dear ones. Let us be always alert in the tricky mesh that the on-line market place is.

(Source: Indian Influencer Governing Council – iigc.org & ASCI newsletter)

# MGP calls for Global Grounding of all Boeing 787 Planes

– Adv. Shirish V. Deshpande, Chairman

Soon after the tragic Ahemdabad accident of Air India flight using Boeing 787 aircraft, British Airways flight BA - 35 from London to Chennai on 15 th June 2025 returned back to London, reportedly due to technical snags. Lufthansa flight LH- 752 from Frankfurt to Hyderabad on 15 th June 2025 returned to Frankfurt reportedly on account of "bomb threat". And the latest Air India flight AI - 314 from Hong Kong to Delhi on 16 th June 2025 has returned to Hong Kong reportedly due to technical snags in the aircraft.

Mumbai Grahak Panchayat (MGP) is alarmed with these three rare incidents of flights returning back to their base stations. MGP has observed certain common factors in these three incidents. Firstly, all these three flights were operating Boing 787 Dreamliner aircrafts.

Secondly, all these three flights were destined to land in Indian cities like Chennai, Hyderabad and Delhi. All these incidents are taking place soon after the tragic Ahemdabad accident of Air India flight using Boeing 787 aircraft in which around 263 persons including 242 on board were killed.

As a consumer organisation MGP is extremely concerned with the passenger safety. Instead of frequent returning of the flights to their base stations, it would have been prudent to ground all Boeing 787 aircrafts worldwide and subject them to thorough technical inspection. DGCA and Government of India ought to have done so




soon after the Ahmedabad tragedy.

Even now DGCA and Government of India would do well to coordinate with International Civil Aviation Organization (ICAO) and insiston global grounding of Boeing 787 Dreamliners for thorough technical inspection all over the world. DGCA is duty bound to take consumers into confidence and explain what were the actual reasons that prompted mid - air return of British Airways, Lufthansa and Air India flights in last 2 days which were operating Boeing 787 dreamliner. Such incidents in the absence of satisfactory clarification from DGCA, are bound to create doubts and panic in the minds of travelling passengers and hence MGP calls upon DGCA to issue immediate statement explaining the circumstances in which these three flights operating Boeing 787 had to return to their base stations.

MGP also calls upon Air India, which has reportedly 34 Boeing 787 Dreamliners, to ground their all 787 dreamliners in the interest of passenger safety, without waiting for any directions from DGCA.

• POSTAL REGISTRATION NO. MCN/158/2023-2025 • WPP LICENSE NO. MR/TECH/WPP-137/NORTH/2023-2025
• LICENSE TO POST WITHOUT PREPAYMENT, ON 5TH & 6TH • VILE PARLE (W) P.O. MUMBAI - 400 056
RNI NO. MAHBIL/2011/39044

## 'ग्राहक गप्पा' हा आपला पॉडकास्ट बघताय ना?

जरूर बघा. सबस्क्राईब व शेअर करा. मृणाल बेडेकर आणि जान्हवी नाडकर्णी या आपल्या कार्यकर्त्या खूप मेहनत घेत आहेत त्यासाठी.

मध्यंतरी या मालिकेत अनुजा आचरेकर आणि कशिश खिमानी या तरुणींशी मंगला गाडगीळ यांनी गप्पा मारल्या.

दि बॉबसन कोलॅबोरेटिव्ह ग्लोबल स्टुडंट चॅलेंज हा अमेरिकेतील एक स्पर्धात्मक उपक्रम आहे. या स्पर्धेत नव्या व्यावसायिक संकल्पनेच्या शक्यतांची तपासणी केली जाते.

बॉबसन कोलॅबोरेटिव्ह २०२५ ग्लोबल स्टुडंट चॅलेंज (मास्टर्स चॅलेंज) मध्ये ६ देशांतील ८ कोलॅबोरेटिव्ह सदस्य संस्थांमधील २७२ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील अंतिम फेरीत अनुजा आचरेकर आणि कशिश खिमानी यांनी दुसरे स्थान मिळवून नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे. अनुजा ही कार्यकारीणी सदस्या अनघा आचरेकर यांची मुलगी. डॉ. शुभा राऊळ, प्रथमेश सोनसुरकर असे काही नामवंत पाहुणेही आले आहेत आपल्या पॉडकास्टमध्ये.

Mumbai Grahak Panchayat




QR Code स्कॅन करून मुंबई ग्राहक पंचायतीचा युट्यूब चॅनेल बघा, सबस्क्राइब करा, लाईक/ शेअर करा, ही विनंती.




ठाणे विभागाच्या अध्यक्षा मीनल टिपणीस आणि अभय दातार श्रोत्यांना मार्गदर्शन करताना



गोरेगावमध्ये वेष्टण विषयक कार्यक्रमात मार्गदर्शन करताना नेहा जोशी



'मसाले आख्यान' कार्यक्रमात छाया वारंगे यांसह महाराष्ट्र सेवा संघ मैत्री विभागाच्या अध्यक्ष माधवी देशमुख, कार्यवाह दक्षता झगडे आणि कार्यकर्त्या



ग्राहक भवनात पॉडकास्टची तयारी करणारी टीम